| CNRNo.MHWR040000472026 | नोंदणी तारिख | ०७/०१/२०२६ |
|---|---|---|
| | दाखल तारिख | ०७/०१/२०२६ |
| | निकाल तारिख | १८/०७/२०२६ |
| | कालावधी | ०० वर्षे, ०६ म, ११ दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः १८/०७/२०२६)

आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ), ८३ अन्वये अपराधाच्या आरोपांसाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपींतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक १६/११/२०२५ रोजी वेळ १८.४५ ते १९.१५ वाजताचे सुमारास भगत लेआउट, सेलू, तालुका–सेलू व जिल्हा–वर्धा, येथे आरोपींनी आपसी संगनमताने आरोपी क्र.१ च्या घरासमोरील टिनाचे शेडमध्ये विदेशी दारुची विक्री करीत असतांना मिळुन आले तसेच आरोपींच्या ताब्यातुन आर.एस.कंपनीच्या ३७५ एम.एल.ची ०१ शिशी, आर.एस.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०७ शिश्या, मॅजीक मुमेंट ओडका कंपनीच्या १८० एम.एल.च्या ११ शिश्या, ओ.सी.ब्लु | : | नकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| | कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०६ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या ३७५ एम.एल.च्या ०२ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०३ शिश्या, फ्रिज मधील टुबर्ग कंपनीच्या ५०० एम.एल.च्या ०५ बियर, दारु विक्रीचे नगदी रक्कम रु.८,५००/–, एक आयफोन, एक व्हीडियोकॉन कंपनीचा फ्रिज व एक गॅसस्टोव्ह अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळुन आला तसेच दारुबंदी अधिका–याने परवान्याची मागणी केली असता आरोपींनी परवाना सादर केला नाही, म्हणून आरोपींनी महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ), ८३ अन्वये गून्हा केला आहे ? | | |
| **२.** | कोणता आदेश ? | : | **आरोपी निर्दोषमुक्त.** |

## :: कारणमीमांसा ::

**३.** अभियोग पक्षाने आरोपींवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार नेहाल सोमेश्वर कोराम यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपीविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**मुद्दा क्र.१ बाबत :**

**४.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ), ८३ प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी आरोपी हे आपसी

संगनमताने स्वतःच्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी दारु अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आले, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंच साक्षीदार क्रमांक १ नेहाल सोमेश्वर कोराम यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. सदर साक्षीदार मौकाजप्तीपंच साक्षीदार असून त्यांच्या साक्षीप्रमाणे दिनांक १६/११/२०२५ रोजी पोलिसांनी त्यांना पंच म्हणून कुठेही बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्यांची एका कागदावर सही घेतली. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांच्या सह्या ओळखल्या त्यावरील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना परवानगीनंतर उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी नाकारले की, दिनांक १६/११/२०२५ रोजी पोलिसांनी त्यांना सेलू टाऊन, तालुका–सेलू व जिल्हा–वर्धा येथे आरोपी क्र.१ च्या घरालगत असलेल्या टिनाच्या शेडमध्ये पंच म्हणून बोलविले होते. आरोपी क्र.१ सोबत आरोपी क्र.२ हा घटनास्थळी हजर होता. पोलीसांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन विदेशी दारु आर.एस.कंपनीच्या ३७५ एम.एल.ची ०१ शिशी, रॉयल स्टॅग कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०७ शिश्या, मॅजीक मुमेंट ओडका कंपनीच्या १८० एम.एल.च्या ११ शिश्या, ओ.सी.ब्लु कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०७ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या ३७५ एम.एल.च्या ०२ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०३ शिश्या, फ्रिज मधील टुबर्ग कंपनीच्या ५०० एम.एल.च्या ०५ कॅन व आरोपी क्र.२ च्या ताब्यातुन दारु विक्रीचे नगदी रक्कम रु.८,५००/–, एक आयफोन, एक मोबाईल चार्जींग, एक व्हीडियोकॉन कंपनीचा फ्रिज व एक गॅसस्टोव्ह जप्त करून पंचनामा तयार केला होता. पोलीसांनी मौकाजप्ती पंचनामा घटनास्थळावर तयार केला व त्यावर त्यांनी वाचुन व समजुन सही केली. तसेच

जप्त मालापैकी प्रत्येकी एक नग सी.ए.परिक्षणाकरिता नमुना काढुन घेतली व त्यावर त्यांची, दुसरा पंच, आरोपी व पोलीसांच्या सहीने लाखेने डबल सील केले.

६. प्रस्तूत प्रकरणात अभियोगपक्षाने फिर्यादी व तपासी अंमलदार यांना तपासले नाही. अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्याकरीता मौकाजप्ती पंच साक्षीदार तपासले, परंतु तपासण्यात आलेल्या मौकाजप्ती पंचानी परस्पर विरोधी जबाब दिला व सरकारी वकिलांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये ही आरोपीला गुंतविण्यासाठी काहीही सांगितले नाही. त्यामुळे मौकाजप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीत आरोपींनी आपसी संगनमताने आरोपी क्र.१ च्या घरासमोरील टिनाचे शेडमध्ये विदेशी दारुची विक्री करीत असतांना मिळुन आले तसेच आरोपींच्या ताब्यातुन आर.एस.कंपनीच्या ३७५ एम.एल.ची ०१ शिशी, आर.एस.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०७ शिश्या, मॅजीक मुमेंट ओडका कंपनीच्या १८० एम.एल.च्या ११ शिश्या, ओ.सी.ब्लु कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०६ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या ३७५ एम.एल.च्या ०२ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०३ शिश्या, फ्रिज मधील टुबर्ग कंपनीच्या ५०० एम.एल.च्या ०५ बियर, दारु विक्रीचे नगदी रक्कम रु.८,५००/-, एक आयफोन, एक व्हीडियोकॉन कंपनीचा फ्रिज व एक गॅसस्टोव्ह अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळुन आले तसेच दारुबंदी अधिका-याने परवान्याची मागणी केली असता परवाना आरोपींनी सादर केला नाही, ही बाब सिध्द झाली नाही.

७. अभियोगपक्षातर्फे रासायनिक तज्ञाचा अहवाल अभिलेखावर सादर करण्यात आला नाही व त्या अनुषंगाने कुठलाही पुरावा उपलब्ध केला नाही. तसेच रासायनिक परीक्षणाकरीता नेलेला नमुना कोणत्या मोहररने नेला त्या मोहररची साक्ष तपासण्यात आली नाही. विषेशतः सदर खटल्यात जप्त करण्यात आलेला वर

नमुद मुद्देमाल हा आरोपींच्या ताब्यातून जप्त करण्यात आला याबाबत कुठलाही ठोस किंवा मौखिक पुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपींच्या ताब्यातून वर नमुद मुद्देमाल जप्तीची बाब व आरोपींविरुध्द कुठलाही ठोस किंवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरले आहे.

८. त्यामुळे अभिलेखावरील एकदंरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपींनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ), ८३ अन्वये गुन्हा केल्याचे सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देऊन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.

**मुद्दा क्रमांक २ बाबत :**

९. वरील मुद्दांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हे त्यांच्यावर ठेवलेल्या आरोपांमधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणाचा विचार करता, मी मुद्दा क्रमांक २ च्या निष्कर्षात,खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **किशोर आत्मारामजी काटोले** व आरोपी क्र.२ **दिपक डालीकराम बिसेन** यांची महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ), ८३ च्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्रक रद्द करण्यात येते.

३. अपराध क्रमांक ९४२/२०२५ मध्ये भरलेली सुरक्षा राशी रक्कम जर असेल तर आरोपींना अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

४. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ] प्रमाणे प्रत्येकी

रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

**५.** अपराध क्रमांक ९४२/२०२५ मधील जप्त मुद्देमाल आर.एस.कंपनीच्या ३७५ एम.एल.ची ०१ शिशी, आर.एस.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०७ शिश्या, मॅजीक मुमेंट ओडका कंपनीच्या १८० एम.एल.च्या ११ शिश्या, ओ.सी.ब्लु कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०६ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या ३७५ एम.एल.च्या ०२ शिश्या, ओ.सी.कंपनीच्या १८० एम.एल.च्या ०३ शिश्या, फ्रिज मधील टुबर्ग कंपनीच्या ५०० एम.एल.च्या ०५ बियर अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, वर्धा यांच्याकडे कायदेशीर विल्हेवाटीकरिता पाठविण्यात यावा.

**६.** अपराध क्रमांक ९४२/२०२५ मधील जप्त मुद्देमाल रक्कम रु. ८,५००/– शासनजमा करावी.

**७.** अपराध क्रमांक ९४२/२०२५ मधील जप्त करण्यात आलेल्या एक आयफोन कंपनीचा मोबाईल, मोबाईल पावर बॅक, एक व्हीडीयोकॉन कंपनीचा फ्रिज व एक गॅसस्टोव्ह सुप्रुतनाम्यावर दिला नसल्यास, अपील कालावधी संपल्यानंतर त्याचे मूळ मालकांस शहनिशा करुन परत करण्यात यावा, मूळ मालकाने परत न घेतल्यास जाहिर लिलाव करुन येणारी रक्कम शासन जमा करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.07.18 16:58:54 +0530

<u>**दिनांक**</u> : १८/०७/२०२६

**( एस.आर.सातभाई )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)